**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल**

**अपिल क्रमांक : के.आर- २९००/२०२२**

**अपिलार्थी, श्री.विवेक भास्कर पाटील,**
मु.पो.बोकडविरा, ता.उरण,
जि.रायगड ४०० ७०२.

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा अतिकार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, उरण उपविभाग, कार्यालय, कोटनाका, उरण, जि.रायगड४०० ७०२.

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित., पनवेल शहर विभाग, मुंबई पुणे रोड, भिंगारी, ता.पनवेल, जि.रायगड ४१० २०६.

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : १२.११.२०२५**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २२.०६.२०२२ | -- | २३.०६.२०२२ | -- |

अपिलार्थी यांनी दि. १०.१०.२०२२ रोजीच्या अर्जान्वये *" सिडको भुखंडामध्ये बसविण्यात आलेल्या ट्रान्सफॉर्मर मशिनच्या एवन फॉर्मला जोडण्यात आलेल्या कागदपत्रांची अपूर्ण माहिती देण्यात आलेली आहे.* "असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक १२.११.२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी अनुपस्थित आहेत (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत). प्रथम अपिलीय प्राधिकारी श्री.जितेंद्र ज.माने, कार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि.पनवेल विभागीय कार्यालय उपस्थित आहेत. तसेच तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.विजय सोनावले व विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.विकास विष्णु गायकवाड, अति.कार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या., उरण उपविभाग उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्राणे माहिती मागितली आहे.

*" द्रोणगिरी नोड सेक्टर२१ मध्ये विजया ऑटोमोबाईल पेट्रोल पंपचे बांधकाम करण्यास आलेले आहे. सदर भुखंडाच्या जवळ एमटीएनएल भुखंड आहे तसेच सदर भुखंडाजवळून ४५ मीटर रुंद रस्ता आहे.*

1) *द्रोणागिरी नोड सेक्टर २१ भुखंडामध्ये विजया ऑटोमोबाईल पेट्रोल पंप व्यवसायाला सन २०२१ मध्ये ट्रान्सफॉर्मर (डीपी) मशिन बसविण्यात आलेली आहे. त्या सदर सिडको भुखंडाची एवन फॉर्मला नियमावली नुसार जोडण्यात आलेल्या कागदपत्रांची नक्कल प्रती मिळाव्यात.*
2) *तसेच सदर भुखंडामधील विजया ऑटोमोबाईल पेट्रोल पंप व्यवसायकाला विजय गॅरो या नावाने ग्रा.क्र.नं.०२५५६०३३०७३८४ असा मीटर देण्यात आलेला आहे. त सदर मीटरी एवन फॉर्मला जोडण्यात आलेल्या कागदपत्रांची नक्कल प्रती मिळाव्यात."*

अपिलार्थी अनुपस्थित असल्यागुळे द्वितीय अपिलावर, गुणवत्तेवर निर्णय देण्यात येत आहे.

सदर प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी असे निवेदन केले की, अपिलार्थी यांना दि.०७.०९.२०२२ रोजीच्या पत्रान्वये माहिती दिलेली आहे.

अपिलार्थी यांना सुनावणीची सुचना प्राप्त होऊन देखील ते अनुपस्थित असल्याने, याबाबत त्यांचे म्हणणे जाणून घेता आले नाही. तथापि त्यांनी दाखल केलेल्या द्वितीय अपीलात नमूद केले की, दि.०७.०९.२०२२ रोजीच्या सुनावणीमध्ये माहिती

अपुर्ण देण्यात आली आहे. तथापि कोणती माहिती अपूर्ण आहे व नेमकी कोणती माहिती त्यांना प्राप्त झाली नाही. याबाबत त्यांनी अपील अर्जात काहीही नमूद केलेले नाही. तसेच ते सुनावणीसाठी अनुपस्थित असल्याने, त्यांचे म्हणणे जाणून घेता आले नाही.

प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रावरुन अपिलार्थी यांना माहिती देण्यात आल्याचे दिसून येत असल्याने, सदर प्रकरणी पुढील कार्यवाहीची आवश्यकता नाही. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(शेखर चंन्रे)
राज्य माहिती आयुक्त,
कोंकण खंडपीठ

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १२ नोव्हेंबर, २०२५ .

राज्य माहिती आयोग,
कोंकण खंडपीठ